| | | | |
|---|---|---|---|
| **PUBLICATION** | Mumbai Tarun Bharat | **DATE** | 18th July 2019 |
| **EDITION** | Mumbai | **PAGE NO.** | 03 |

मुंबई तरुण भारत

# 'हर हाईनेस्ट' त्रिमित रचना देणार स्त्रियांच्या स्वतःच्या घरस्वप्नाला आकार

**मुंबई, दि. १७ (प्रतिनिधी):** अनेकदा नव्याने घर घेताना ते घरातील कर्त्या पुरुषाच्या नावानेच घेतले जाते. आजही घरखरेदी प्रक्रियेत पुरुषांचा वरचष्मा जाणवतो. परंतु, आजच्या काळात स्त्रिया स्वावलंबी झाल्या आहेत. त्या आता स्वतःच्या नावावर घर विकत घेऊ शकतात. महिलांसाठी आता हे स्वप्न प्रत्यक्षात साकार होणे सहज शक्य होणार असून 'त्रिमित रचना'तर्फे 'हर हाईनेस्ट'च्या खास स्त्रियांसाठी सुरक्षित, स्वस्त आणि दर्जेदार घरे उपलब्ध करण्यात येणार आहेत.

येत्या दि. १९ जुलै रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह, शिवाजी पार्क, दादर येथे महाराष्ट्रातून ३५० हून अधिक महिलांच्या उपस्थितीत 'हर हाईनेस्ट'ची घोषणा करण्यात येणार आहे. या योजनेचे नेमके स्वरूप स्पष्ट करताना 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स'च्या महिला उद्योजक समितीच्या अध्यक्षा व 'त्रिमित रचने'च्या कॉन्सेप्ट डिझायनर आणि इनोव्हेटर प्रज्ञा पोंक्षे म्हणाल्या की, ''हर हाईनेस्ट ही संकल्पना फक्त स्त्रियांसाठी बनवण्यात आली आहे. आम्ही महिलांना सुरक्षित आणि परवडण्याजोग्या घरांचा पर्याय उपलब्ध करून देणार आहोत.'' या कार्यक्रमात मराठी चित्रपट दिग्दर्शिका, निर्मात्या आणि पटकथालेखक सुमित्रा भावे, सुनील सुखटणकर व चित्रपट क्षेत्रातील इतर मान्यवरांच्या उपस्थितीत 'महिला सशक्तीकरण, स्वातंत्र्य आणि स्वतःची ओळख' या विषयावर परिसंवाद व 'वेलकम होम' चित्रपटाचे प्रदर्शनही आयोजित करण्यात आले आहे.